नियमीत दिवाणी दावा क्र ४९/२०१९.
नि. क्र. २४

**वादीचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री लिल्हारे यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

१२. मी पीओपीचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीकडून चार चाकी वाहन भाड्याने चालविण्याकरीता घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक ०२/०२/२०१८ रोजी चार चाकी गाडी स्कॉर्पीयो प्रतिवादीकडून घेतली होती. सदरची गाडी माझ्याकडे जुलै २०१८ पर्यंत होती. हे म्हणणे खरे आहे की, मी जुलै २०१८ पर्यंत ती गाडी रस्त्यावर चालवली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीच्या विरुध्द फौजदारी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाडी खरेदी केली त्यावेळी प्रतिवादीने गाडीची सर्व कागदपत्रे मला दिलेली होती. माझ्याकडे केवळ मुळ नोटरी दस्त दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, गाडीचे हफ्त्याची रक्कम मला प्रतिवादीच्या खात्यात भरणे गरजेचे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी नियमीतपणे हफ्त्याची रक्कम प्रतिवादीच्या खात्यात भरली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पहिला हफ्ता वेळेत न भरल्याने मला दंडाची रक्कम भरावी लागली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी एप्रिल व मे महीन्याचे हफ्ते वेळेत भरले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक ०७/०६/२०१८ रोजी रक्कम रुपये १६,३००/– व दिनांक ०७/०७/२०१८ रोजी रक्कम रुपये १६,३००/– प्रतिवादीला कधीही दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला दिनांक ०७/०६/२०१८ रोजी रक्कम रुपये १६,३००/– दिले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०७/०६/२०१८ पासुन पुढील हफ्ते प्रतिवादीने भरलेले आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मी जुलै २०१८ पर्यंत हफ्ते भरलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी ठरल्याप्रमाणे हफ्त्याची रक्कम कधीही भरली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २८/०७/२०१८ रोजी मी दोन ईसम नामे मनिष माधोराव मेश्राम व निरज कुवरलाल वैरागडे यांचे समक्ष प्रतिवादीला त्याची गाडी चालवू शकत नाही असे बोलून गाडी परत दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी मुळ नोटरी करार प्रतिवादीला परत दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी मनिष मेश्राम व निरज वैरागडे यांचेसमक्ष मुळ नोटरी करार प्रतिवादीला परत दिला होता. निशाणी ४२ वरील मुळ करारनामा मला दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, त्यामधील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. आता मला

करारनाम्यावरील पान क्र. ३ वरील खालील बाजुस असलेली स्वाक्षरी दाखविली. सदरची स्वाक्षरी माझी आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, ती स्वाक्षरी मी प्रतिवादीच्या घरी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती स्वाक्षरी मी दिनांक २८/०७/२०१८ रोजी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्यावेळी गाडी परत दिली त्यावेळी गाडीची परिस्थीती खराब होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने दिनांक ०७/०८/२०१८ रोजी गाडी नागपुर येथे नेवून दुरुस्त केली व त्याकरीता प्रतिवादीला रक्कम रुपये १,१९,०००/– ईतका खर्च आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला झालेला खर्च भरुन देण्यास मी जबाबदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामुळे प्रतिवादीला कमी किमतीत गाडी विक्री करावी लागली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे प्रतिवादीचे रक्कम रुपये ९६,०००/– चे नुकसान झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामुळे प्रतिवादीला रक्कम रुपये २,६५,०००/– चा खर्च आला व त्यामुळे सदरची रक्कम मी प्रतिवादीला देणे लागत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५/१२/२०१८ रोजी प्रतिवादीला खोटी नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझ्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने गाडी दुसरीकडे विक्री करावी याकरीता मी गाडीची सर्व कागदपत्रे व नोटरी करारनामा प्रतिवादीला परत दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**स्वा/–**
**(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांकः– १२/०८/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आमगांव.**